सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
या विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या
आकृतिबंधास मंजूरी देणे बाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :एसयुएस-२००५/(१२३/०५)/विशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ मे, २००७

वाचा :- (१) शासन निर्णय क्रमांक , असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१
(२) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे पत्र क्रमांक सोविसो / ३५२, दिनांक २५ एप्रिल,२००५

**प्रस्तावना :-** वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक , असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ नुसार सर्व विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदे व शिक्षकेतर पदे, त्यापैकी रिक्त पदे यांचा आढावा घेऊन सुधारित आकृतिबंध मंजूर करावयाचा आहे. त्यानुसार सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठातील शिक्षकेतर पदांचा प्रस्ताव वित्त विभागामार्फत संयुक्त सचिव समितीला सादर करण्यात आला. संयुक्त सचिव समितीने मान्य केलेला प्रस्ताव उच्चस्तर सचिव समिती समोर सादर करण्यात आला होता. उच्चस्तर सचिव समितीने आढाव्याच्या प्रस्तावास दिनांक ३१.१०.२००६ च्या बैठकीमध्ये मान्यता दिली. या प्रस्तावामध्ये रु. १२,०००-१६,५०० या वेतनश्रेणीतील अथवा त्यापेक्षा जास्त वेतनश्रेणीची पदे समाविष्ट नसल्याने उच्चस्तर सचिव समितीने दिनांक ३१.१०.२००६ च्या बैठकीत सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठाच्या शिक्षकेतर पदांच्या आढाव्यास दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने आकृतिबंधाचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय क्रमांक , असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील तरतूदीनुसार सोलापूर विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून उच्चस्तर समितीने मान्य केल्याप्रमाणे सोलापूर विद्यापीठासाठी एकूण १५० शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात येत आहे. १५० पदांचा संवर्गनिहाय तपशील सोबत प्रपत्र अ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. सदर आकृतीबंध खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

अ) आकृतीबंधातील १५० पदांपैकी ४१ पदे सध्या विद्यापीठाच्या आस्थापनेवर मंजूर असल्याप्रमाणे राहतील.

ब) १५० पदांपैकी ३० पदे कंत्राटी पध्दतीने (Contract Basis) भरावयाची आहेत.

क) नव्याने निर्माण करावयाच्या पदांसाठी आर्थिक तरतूद मंजूर झाल्यानंतरच सदर पदे भरता येतील.

३. सोलापूर विद्यापीठासाठी सध्या मंजूर असलेल्या ४१ शिक्षकेतर पदांपैकी रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १६७/०७/व्यय-५, दिनांक ७.३.२००७ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध त्याचा संगणक संकेतांक २००७०५१११६२०२६००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संअघोरपडे

( सं.अ. घोरपडे )

कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. राज्यपाल तथा कुलपती यांचे उपसचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,

३. सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर .

४. कुलसचिव , सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई .

५. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई .

६. जिल्हा कोषाधिकारी, सोलापूर .

७. कार्यासन साशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई .

८. कार्यासन अधिकारी तांशि-३ यांना सदर शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्याच्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

९. नियोजन विभाग, मंत्रालय , मुंबई .

१०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

११. निवड धारिका, विशि-५.

C:\Documents and Settings\dit\My Documents\UA = Note\Solapur Universitiy\G.R..doc

शासन निर्णय : एसयुएस-२००५/(१२३/०५)/विशि-५, दिनांक ११ मे, २००७ चे सहपत्र

प्रपत्र अ

## सोलापूर विद्यापीठासाठी शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | मंजूर पदे | नव्याने निर्माण करावयाची पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | उपकुलसचिव | १०६५०-३२५-१५८५० | १ | ३ | ४ |
| २. | कायदा अधिकारी | ८०००-२७५-१३५०० | ० | १ | १ |
| ३. | सहाय्यक कुलसचिव | ८०००-२७५-१३५०० | ० | ६ | ६ |
| ४. | वैद्यकिय अधिकारी | ८०००-२७५-१३५०० | ० | १ | १ |
| ५. | अधीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ | ७ | ८ |
| ६. | लेखापाल | ६५००-२००-१०५०० | १ | ० | १ |
| ७. | लघुलेखक | ५५००-१७५-९००० | ० | ४ | ४ |
| ८. | सांख्यिकी सहाय्यक | ५५००-१७५-९००० | ० | १ | १ |
| ९. | सहाय्यक अधीक्षक | ५५००-१७५-९००० | १ | ९ | १० |
| १०. | वरिष्ठ सहाय्यक (ग्रंथालय) | ४५००-१२५-७००० | ३ | ० | ३ |
| ११. | कंपाऊंडर (मिश्रक) | ४५००-१२५-७००० | ० | १ | १ |
| १२. | संग्रहालय सहाय्यक | ४५००-१२५-७००० | १ | ० | १ |
| १३. | वरिष्ठ लिपिक | ४०००-१००-६००० | ४ | १८ | २२ |
| १४. | सहाय्यक भांडारपाल | ४०००-१००-६००० | २ | १ | ३ |
| १५. | लघुटंकलेखक | ४०००-१००-६००० | ० | ३ | ३ |
| १६. | प्रयोगशाळा सहाय्यक | ३२००-८५-४९०० | ४ | ० | ४ |
| १७. | तारतंत्री (Wireman) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ० | १ | १ |
| १८. | कनिष्ठ लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ८ | ३२ | ४० |
| १९. | रेकॉर्ड किपर -नि-लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ० | १ | १ |
| २०. | दूरध्वनी चालक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ० | ३ | ३ |
| २१. | प्रयोगशाळा परिचर | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ६ | ० | ६ |
| २२. | ग्रंथालय परिचर | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ | ० | १ |
| २३. | वाहन चालक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ० | ४ | ४ |
| २४. | जमादार | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ० | १ | १ |
| २५. | हवालदार | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० | ० | १ | १ |
| २६. | झेरॉक्स ऑपरेटर | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ० | २ | २ |
| २७. | स्वच्छक | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २ | ० | २ |
| २८. | चौकीदार | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ३ | ० | ३ |
| २९. | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ३ | ९ | १२ |
| | एकूण पदे | | ४१ | १०९ | १५० |